## नियमीत दिवाणी मुकदमा नं. २९५/२०२० मधील नि. २० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ८, ११, १२, १५, १६ व २० यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत स्वीकारणेत यावी यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, प्रतिवादी यांना दि. २२/१०/२०२० रोजी समन्स तामील झाले असून ते दि. २८/१०/२०२० रोजी न्यायालयात हजर झाले. परंतु कोविड या महामारीमुळे न्यायालयाचे कामकाज बंद होते. तसेच संचार बंदी असल्यामुळे प्रतिवादी यांना महत्वाची कागदपत्रे काढून वकीलांना माहिती देता आली नाही. त्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदरचा विलंब प्रतिवादी यांनी जाणूनबुजून केला नाही. त्यामुळे प्रतिवादींना झालेला विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे.

३. वादीने सदर अर्जावर आपले म्हणणे देवून सदर अर्ज खोटा व बनावट आहे असे सांगून अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. वादीने पुढे असे सांगितले आहे की, अर्ज मंजुर झाल्यास जास्तीचा खर्च लावून मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व दाव्यातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाद मिळकतीच्या

वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ८, ११, १२, १५, १६ व २० यांनी अर्जात नमुद केलेले कारण योग्य व संयुक्तिक वाटत नाही.

५. वादींनी प्रस्तुत दावा वाटपासाठी दाखल केला असल्यामुळे प्रतिवादी यांचे मौल्यवान हक्क व हितसंबंध दावा मिळकतीमध्ये गुंतलेले आहेत. दाव्यामध्ये अद्यापपर्यंत पुराव्यास सुरवात झालेली नाही. नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे जरुरी आहे. त्यामुळे अर्जातील तांत्रीक बाबीचा विचार करण्याऐवजी दाव्याचा गुणदोषावर निकाली होणे विचारात घेणे जरुरीचे आहे. वरील सर्व विश्लेषणावरुन प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाबाबत खर्चाचे आदेश पारीत करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ८, ११, १२, १५, १६ व २० यांनी सर्वांनी मिळून वादीस रक्कम रु.१००/– खर्च म्हणून अदा केल्यास प्रतिवादी क्र. ८, ११, १२, १५,१६ व २० यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

**( यु. एम. पाटील )**

दि. २१/१०/२०२१. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgement/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| **(a)** | Name of the Stenographer | **:-** | A. A. Chavan. |
| **(b)** | Court | **:-** | 2nd Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| **(c)** | Judgment/Order signed by PO on | **:-** | 21/10/2021. |
| **(d)** | Judgment/Order uploaded on | **:-** | 21/10/2021. |